| | |
|---|---|
| MHYA160007772023 | खटला दाखल तारीख : २५/०८/२०२३.<br>खटला नोंदणी तारीख : २५/०८/२०२३.<br>निकालाची तारीख : ०४/०८/२०२६.<br>कालावधी : ०२ वर्ष ११ महिने ०९ दिवस |

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४७५/२०२३</u> <u>निशाणी क्र.१२ खाली.</u>
<u>सरकार विरुध्द सागर संजय कामडी</u>

## <u>न्यायनिर्णय</u>

(अधीघोषीत दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६)

१. सदरचा खटल्यात आरोपीवर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ व ५०६ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२. दिनांक १६/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीची पती शेतात गेले होते. फिर्यादी ही तिच्या घरासमोर उभी होती. त्यावेळी आरोपी त्याठिकाणी हा दारु पिवून फिर्यादीजवळ आला. आरोपीने फिर्यादीला तिचा पती कुठे आहे असे विचारले. त्यावेळी फिर्यादीने तिचा पती शेतात गेले आहे. फिर्यादीने आरोपीला यापूर्वीच असे सांगीतले होते की, दारु पिवून तिच्या घरी येत जाऊ नको, तरी देखील तु दारु पिवून आला, माझे पती घरी नाही असे फिर्यादीने म्हटले. आरोपीने फिर्यादीला तु जास्त बोलु नको असे म्हणून फिर्यादीला ''तु जास्त हुशार झाली का ?, तु जास्त माजली का, साली छिनाल, रांड'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपीने तुझ्या पतीला पाहुन घेईन असे म्हणून धमकी दिली. म्हणून फिर्यादी सौ. वृषाली सतिश भाकरे हिने आरोपीविरुद्ध तोंडी रिपोर्ट दिला आहे.

३.		तपासाचे काम पोलीस नाईक आशिष वा. अवझाडे यांचेकडे दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष केला. साक्षीदारांचे बयान नोंदविले, आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४.		अभिलेखावरील तथ्यांच्या आधारे आरोपीविरुध्द माझ्या पूर्व पिठासीन अधिकारी यांनी गुन्हयाचे प्रतिकथन नि.क्र.१२ वर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ व ५०६ अन्वये नोंदविले. सदरच्या प्रतिकथनातील मजकूर आरोपींना त्यांच्या बोलीभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला असता आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे आरोपी विरुध्द गुन्हा शाबित करण्यासाठी एकुन चार साक्षीदारास तपासले आहेत.

५.		आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे स्पष्टीकरण निशाणी क्र. २८ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपीने त्याच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

६.		अभियोग पक्षाची कथने, आरोपीचा बचाव व दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाचे समोर आलेल्या बाबींचा विचार करता खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. मी त्यावरील निष्कर्ष सकारण पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१६/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास मौजा नांदेसावंगी, तालुका बाभुळगाव जि. यवतमाळ येथील फिर्यादीच्या घरासमोर रस्त्यावर फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ...नाही. |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला फौजदारी पात्र धाक दपटशाही करुन तुझ्या पतीला पाहुन घेतो धमकी दिली, त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला आहे? | ...नाही. |
| ३. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. १५ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र. १९ वरील जबानी रिपोर्ट, निशाणी क्र. २० वरील प्रथम खबर अहवाल, निशाणी २९ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ३० व ३१ वरील सुचनापत्र व चेहरापट्टी फॉर्म इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दा क्र. १ व २ करीता :**

७. अभियोग पक्षाने दिनांक १६/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान मौजा नांदेसावंगी, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथे आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व तिच्या पतीला पाहुन घेतो धमकी दिली हे शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षाने चार

साक्षीदारांना तपासले आहे. वरील दोन्ही वाद मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी एकत्रीत चर्चेकरीता घेतले आहेत.

८. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ हिने तिच्या न्यायालयासमोरील पुराव्यात असे सांगीतले की, ती आरोपीला ओळखते. आरोपी हा तिच्या घरासमोर राहतो. घटना दिनांक १६.०४.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास मौजे नांदेसावंगी येथील तिच्या घराच्या समोरील रोडवर घडली होती. त्यादिवशी तिचे पती शेतामध्ये गेले होते. ती तिच्या घरासमोरील रोडवर उभी असतांना आरोपी तेथून चालला होता. त्यावेळी आरोपीने तिला विचाले की, तुझे पती कोठे गेले. त्यानंतर तिने आरोपीला सांगीतले की, तिचे पती शेतात गेले आहेत. त्यावेळी आरोपी तिला म्हणाला की, तु खुप हुशार आहे, माजली, छिनाल, रांड अशा भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपीने तिच्या पतीला पाहुन घेईन अशी धमकी दिली. त्यानंतर तिने पोलीस स्टेशनला जावून आरोपीविरुध्द नि. क्र. १९ वर रिपोर्ट दिला व नि. क्र. २० वर छापील प्रथम खबरी अहवाल दाखल केला. सदरच्या रिपोर्टवर तिच्या सहया असल्याचे सांगीतले आहे.

९. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ हा न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, वृषाली भोकरे ही त्याची पत्नी आहे. तो आरोपीला ओळखतो. घटना दिनांक १६.०४.२०२३ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे नांदेसावंगी येथील त्याच्या घराच्या समोरील सार्वजनिक रोडवर घडली होती. त्यादिवशी तो शेतामध्ये होता. त्याला त्याच्या घरुन त्याच्या पत्नीचा फोन आला व तिने त्याला सांगीतले की, आरोपी दारु पिवून आला व त्याने तिला शिवीगाळ केली. आरोपीने तिला रांडीची, फोकनीची अशी शिवीगाळे केली. त्याच्या पत्नीची त्यादिवशी मनस्थीती चांगली नसल्यामुळे तो व त्याची पत्नी

दिनांक १८.०४.२०२३ रोजी पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यास गेले. त्याच्या पत्नीने आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला.

१०. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ हा न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, तो आरोपी सागर कामडी व फिर्यादी वृषाली भोकरे यांना ओळखतो. सन २०२३ मध्ये पोलीसांनी त्याला तो शेतात जात असतांना सही करण्यास सांगीतले होते. सदरच्या घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे तो मान्य करीत आहे. परंतू त्यातील मजकुर त्याला माहीती नाही. सदरचा साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यात आला. परंतू त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही.

११. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ हा तपासीक अधिकारी असून न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, तो आरोपीला ओळखतो. तो फिर्यादी वृषाली भोकरे हिला ओळखतो. सन २०२३ मध्ये तो पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होता. दिनांक १९.०४.२०२३ रोजी अपराध क्र. २७३/२०२३ कलम २९४ व ५०६ भां. दं. वि. या गुन्हयाचा तपास त्याच्याकडे देण्यात आला. त्यात त्याला एफ. आय. आर., केस डायरी, फिर्यादीचा जबानी रिपोर्ट ईत्यादी कागदपत्रे देण्यात आली होती. त्यानंतर तो दिनांक २९.०४.२०२३ रोजी मौजा नांदेसावंगी येथील वार्ड क्र. २ येथील फिर्यादीच्या घरासमोर घटनास्थळावर जावून त्यांनी फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे दोन पंचासमक्ष निशाणी क्र. २९ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यावर त्यांच्या व दोन पंचांच्या सहया असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावेळी फिर्यादी व दोन पंच त्याठिकाणी हजर होते. त्यानंतर त्यांनी आरोपीला अनुक्रमे निशाणी क्र. ३० व ३१ वरील सूचनापत्र व चेहरापट्टीचे फॉर्म भरुन सोडले. आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात

दाखल केले.

१३. अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. राठोड व आरोपीचे विधिज्ञ श्री. एम. एम. दातार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ हिच्या तोंडी पुराव्याने नि. क्र. १९ वरील जबानी रिपोर्टमधील मजकुर व नि. क्र. २० वरील छापील प्रथम खबरी अहवालातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केलेला आहे. साक्षीदार क्र. २ हिच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता तिने दिनांक १८.०४.२०२३ रोजी आरोपीविरुध्द तिच्या पतीच्या सांगण्यावरुन रिपोर्ट दिला होता ही बाब मान्य केली आहे. आरोपीच्या वतीने निशाणी क्र. २३ वर साक्षीदार क्र. २ हिने दिलेला तिच्या पतीविरुध्दचा रिपोर्ट सिध्द केलेला आहे. साक्षीदार क्र. २ ही देखील त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगत आहे. साक्षीदार क्र. ३ हा साक्षीदार क्र. २ हीचा पती असून त्याच्या सांगण्यावरुनच साक्षीदार क्र. २ हिने आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला होता. घटना दिनांक १६.०४.२०२३ रोजी घडल्यानंतर निशाणी क्र. १९ वरील रिपोर्ट हा दिनांक १८.०४.२०२३ रोजी दिलेला होता. निशाणी क्र. १९ वरील रिपोर्ट देण्यास झालेला विलंब संयुक्तीक कारणाने अभियोग पक्षाने सिध्द केलेला नाही.

१४. साक्षीदार क्र. ३ हा साक्षीदार क्र. २ हीचा पती असून सदरचा साक्षीदार त्याच्याविरुध्द सन २०२२ रोजी दारुच्या केसेस होत्या ही बाब मान्य करीत आहे. साक्षीदार क्र. ३ हा घटनेवेळी तो शेतात होता ही बाब देखील मान्य करीत आहे. त्यामुळे साक्षीदार क्र. ३ हा प्रत्यक्षदर्शनी साक्षीदार नाही. साक्षीदार क्र. १ हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहे.

सदरचा साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नाही. अभियोग पक्षाने त्याचा उलटतपास घेवून देखील अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही बाब साक्षीदार क्र. १ याने सांगीतलेली नाही.

१५. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ हा तपासीक अधिकारी असून त्याने निशाणी क्र. २९ वरील घटनास्थळ पंचनामा केल्यानंतर साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते. साक्षीदार क्र. ४ हा फिर्यादीने सांगीतल्याप्रमाणे त्याने पंच घेतले होते ही बाब मान्य करीत आहे. साक्षीदार क्र. ४ हा दिनांक २३.०४.२०२३ रोजी फिर्यादी वैशाली भोकरे हिने पुन्हा रिपोर्ट देवून आरोपीविरुध्द तिच्या पतीने जबरदस्तीने रिपोर्ट देण्यास सांगीतला होता व तिने रिपोर्ट दिला नाही म्हणून तिला तिच्या पतीने थापडबुक्याने मारहाण केली होती व दोन्ही मुलांना मारुन टाकीन अशी धमकी दिली होती याबाबी मान्य केल्या आहेत.

१६. अभियोग पक्षाचा न्यायालयाच्यासमोर आलेला लेखी व तोंडी पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर आरोपी व त्याच्या भावाने साक्षीदार क्र. ३ हा दारु विक्री करतो म्हणून तक्रार केल्यानंतर त्याचा राग मनात धरुन साक्षीदार क्र. ३ याने साक्षीदार क्र. २हीला आरोपीविरुध्द बळजबरीने रिपोर्ट देण्यास लावला आहे असा आरोपीच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद मी ग्राहय धरुन मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करीता** :

१७. मी या आधीच मुद्दा क्र.१ व २ विश्लेषीत केल्याप्रमाणे अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ व ५०६ अंतर्गत गुन्हा संशयापलीकडे शाबित केलेला नाही. म्हणून आरोपीला सदरच्या गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत.

त्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करतो.

**–: <u>आदेश</u> :–**

(१) आरोपी सागर संजय कामडी याची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ व ५०६ अन्वयेचा गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

(३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्याची उपस्थिती हमी म्हणून रु.१५,०००/– रकमेची जमानतपत्र दयावेत. आरोपीने दिलेली जमानतपत्र आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.08.04 14:25:39 +0530

बाभुळगाव. (एच.एस.सातपुते)
दिनांक : ०४/०८/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
बाभुळगाव.